# महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

## महासंचालक

(संकल्पन,प्रशिक्षण,जलविज्ञान,संशोधन व सुरक्षितता)

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था,
नाशिक



# नागरिकांची सनद

**(दि.२१/०२/२०१२)**

# सूची


| अनुक्रमांक | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | **प्रस्तावना** | १ |
| २. | **संघटनांची कामे व व्याप्ती**<br>• महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था<br>• मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना<br>• धरण सूरक्षितता संघटना<br>• महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी<br>• गूण नियंत्रण<br>• नियोजन व जलविज्ञान | <br>२-३<br>३<br>४<br>४-५<br>५<br>५ |
| ३. | **बांधिलकी** | ५ |
| ४. | **नागरिकांची जबाबदारी** | ६ |
| ५. | **सनदेचा आढावा** | ६ |
| ६. | **नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी** | ६ |
| ७. | **संघटना तक्ता** | ७ |

## १. प्रस्तावना-

महासंचालक (संप्रजसंसु) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांचे कार्यकक्षेत दोन मुख्य अभियंता कार्यालये कार्यरत आहेत.

१) मुख्य अभियंता (सं.प्र.सं.सु.) यांचे कार्यकक्षेत जलसंपदा विभागातील महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (सीडीओ), धरण सुरक्षितता संघटना (डीएसओ), महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (मेटा) तसेच पुणे,नागपूर व औरंगाबाद येथे गुण नियंत्रण मंडळे आहेत.

२) मुख्य अभियंता (नियोजन व जलविज्ञान) यांचे कार्यकक्षेत आधार सामग्री संकलन मंडळ व आधार सामग्री पृथःकरण मंडळ कार्यरत आहेत.

ही कार्यालये नागरिकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधिल आहे. या संस्थांतर्गत असलेल्या प्रत्येक मंडळ कार्यालयाने त्यांची स्वतंत्र नागरिकांची सनद तयार केली असुन ती नागरिकांना सार्वजनिक सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूक देवून नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतिपूर्वक सोडविण्यास कटिबध्द आहे.

या संस्थांसंबंधीत माहिती समाजातील कोणीही सर्वसामान्य जागरुक नागरिक, स्वयंसेवी संस्था इ.ना मिळवून घेण्याची इच्छा असू शकते. या नागरिकांच्या सनदेचा मुख्य उद्देश हा वरील संबंधित माहितीचे स्वरुप काय असेल, ही माहिती कोणत्या अधिका-याकडे मिळेल व मिळविण्यासाठी किती कालावधी लागेल याची निश्चित ग्वाही देणे व त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे हा आहे. सदरील माहिती ही खालीलप्रमाणे आहे.

- सर्व कार्यालयांतून कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहीररित्या प्रदर्शित करणे.
- कार्यलयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी/तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.
- माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे.
- विभागाच्या कामकाजात सातत्य ठेऊन व आधुनिकता आणून विभागाची लोकभिमुखता वाढविणे.
- नागरीकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.
- सदर माहिती प्रत्येक कार्यालयांमार्फत त्यांचे संकेतस्थळी ठेवण्यात आली असून ती नियमित अद्ययावत केली जाते. जागरुक नागरिक, स्वयंसेवी संघटना, इंटरनेटच्या माध्यमातून देखील वरील माहिती घेऊ शकतात.

## २.० संघटनांची कामे व व्याप्ती -

### २.१ महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था

महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी) मुख्यत: विविध प्रकल्पांच्या क्षेत्रिय समस्यांशी संबंधित उपयोजित संशोधनाची (Applied Research) कामे करते. राज्यस्तरावरील संशोधन संस्था असल्याने संपूर्ण महाराष्ट्र हे मेरीचे कार्यक्षेत्र आहे. राज्यातील जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या तीन विभागातील संशोधन विषयक कामांसाठी या संस्थेची निर्मिती करण्यात आली आहे.

उपयोजित संशोधनाची कामे मुख्यत: क्षेत्रिय अधिकारी आणि मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून संस्थेकडे सोपविली जातात. मूलभूत संशोधनाची कामे संस्था स्वत:च अंगिकारते किंवा भारत सरकारच्या जलसंसाधन मंत्रालय आणि / किंवा वाहतूक मंत्रालयांतर्गत असलेल्या विविध राष्ट्रीय स्तरावरील संस्थांकडून विविध योजनांखाली मेरीकडे सोपविली जातात. संशोधन कामांव्यतिरिक्त बांधकाम सामग्रीच्या गुणवत्ता चाचण्या, मिश्र संधानक, संकल्पन ही कामे मेरीत केली जातात. निमशासकीय आणि खाजगी संस्थांकडून येणाऱ्या कामांसंबंधीचे उपयोजित संशोधन व चाचणी कामेही मेरीत केली जातात. संस्थेत खालील विषयातील संशोधन व चाचण्या केल्या जातात.

संस्था महासंचालक (सं.प्र.ज.सं.सु), म.अ.सं.संस्था , नाशिक यांचे अंतर्गत व मुख्य अभियंता (सं.प्र.सं.सु.) म.अ.प्र.प्रबोधिनी, नाशिक यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे. संस्थेचे प्रशासकीय कार्यालय नाशिक येथे आहे. अधीक्षक अभियंता व सहसंचालक हे संस्थेच्या दैनंदिन कार्यवाही करण्यासाठी महासंचालक व मुख्य अभियंता (सं.प्र.सं.सु.) यांचे अधिपत्याखाली आहेत.

संशोधन आणि चाचणीकामे संस्थेतील नऊ (९) संशोधन विभागांमार्फत केली जातात. विभागाचा प्रमुख संशोधन अधिकारी / वैज्ञानिक संशोधन अधिकारी हा कार्यकारी अभियंता दर्जाचा अधिकारी आहे. त्यांच्याकडील कामाचा संक्षिप्त तपशिल पुढे नमूद करण्यात येत आहे.

**(१) जलगती संशोधन विभाग क्र. १** : धरणांचे सांडवे, विमोचके, पूर संरक्षक कामे, उल्लोळ (Surge) व्यवस्था, पुलांचे आराखडे यांच्या जलीय प्रतिकृतींचे अभ्यास करण्यासाठी संस्थेमध्ये पायाभूत सुविधा असलेली मोठी जलगती प्रयोगशाळा आहे.

**(२) जलाशय गाळ सर्वेक्षण विभाग :** जलाशयांमध्ये साठणाऱ्या गाळाचे तीन पद्धतींनी सर्वेक्षण संस्थेमध्ये केले जाते. १) पारंपरिक पद्धत, २) डीजीपीएस् (Differential Global Positioning System) पद्धतीने ३) सुदूर संवेदन तंत्रज्ञान तसेच Hybrid Technique द्वारे गाळ सर्वेक्षणाची कामे केली जातात. सुदुर संवेदन तंत्रज्ञान वापरुन संस्थेने आतापर्यन्त महाराष्ट्रातील तसेच इतर राज्यातील बऱ्याच प्रकल्पांच्या जलाशयांचे गाळसर्वेक्षणाचे काम केली आहेत.

**(३ ) मृद्यांत्रिकी संशोधन विभाग क्र. १:** मृद्यांत्रिकी शाखेमध्ये उपयोजित आणि मूलभूत संशोधनाबरोबरच प्रकल्पांसाठी चाचणी कामे करण्यात येतात. महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी मातीच्या अभियांत्रिकी गुणधर्मांच्या (Engineering Properties) चाचण्या विभागात करण्यात येतात आणि त्या गुणधर्मांवर आधारित धरणांचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेद्वारे करण्यात येते.

**(४) सामुग्री चाचणी विभाग :** बांधकाम सामग्रीच्या विविध चाचण्या (जसे सीमेंट, वाळू, दगड, विटा, पाईप, लोखंड, चुना (Lime), फ्लाय ॲश) केल्या जातात. संस्थेमध्ये ९०० मिमी व्यासाचे मोठे काँक्रीट अथवा बांधकामाचे दंडगोल (Cylinders) २००० टन दमनक्षमतेच्या यंत्रावर दमनसामर्थ्यासाठी तपासण्याची सोय उपलब्ध आहे. क्षेत्रिय कामांच्या आवश्यकतांनुसार वेगवेगळ्या प्रकारची मिश्र संकल्पने करुन दिली जातात.

**(५) संरचनात्मक संशोधन व पदार्थविज्ञान विभाग :** संरचनात्मक संशोधन व पदार्थ विज्ञान शाखेमध्ये बांधकामांच्या चाचण्या, पूल-जलसेतू- स्लॅबज् यांच्या भार चाचण्या, बांधकामांचे संरचनात्मक विश्लेषण आणि पाषाण यांत्रिकी मधील चाचण्या केल्या जातात. बांधकामाची गुणवत्ता तपासण्यासाठी अविनाशी चाचण्या (Non Destructive Testing) करण्याची सोय या विभागामध्ये आहे. तसेच पिण्याच्या पाण्याचे आणि सांडपाण्याचे विश्लेषण, चाळ (Gravel) आणि गाळणीची वाळू (Filter sand), ब्लिचिंग पावडर, तुरटी इ. वरील चाचण्या संस्थेमध्ये केल्या जातात.

**(६) सुदूर संवेदन व भूमाहितीशास्त्र विभाग :** सुदूर संवेदन तंत्रज्ञानाने नदी खोरे प्रकल्पात जलाशयांमध्ये साठलेल्या गाळाचे सर्वेक्षण, पीक मोजणी व पडताळणी (Crop mapping), जमीन आणि जमीन वापर इ. कामे या विभागात केली जातात. तसेच या विभागात उपग्रहाकडून प्राप्त अंकीय प्रतिमा संगणकात उतरविणे, प्रक्रिया करणे आणि प्रतिमेचे विश्लेषण करण्याच्या सुविधा आहेत.

**(७) महामार्ग अभियांत्रिकी संशोधन विभाग क्र. १:** रस्त्यांच्या बांधकाम सामग्रीच्या गुणवत्ता चाचण्या विभागाच्या प्रयोगशाळेत केल्या जातात. वाहतूक अभ्यास (Traffic Census Study), रस्त्यांच्या उपयोजित संशोधनाची कामेही क्षेत्रिय आवश्यकतांनुसार करण्यात येतात.

**(८) उपकरणे संशोधन विभाग :** धरणांमधील तणाव, जलाशयातील पाणी पातळीचे धरणावर होणारे परिणाम कळण्यासाठी राज्यातील विविध धरणांमध्ये बसविण्यासाठी लागणाऱ्या वेगवेगळ्या उपकरणांची खरेदी, उपकरणे बसविणे (Installation), काही उपकरणांची निर्मिती तसेच दुरुस्ती करणे या विभागात केली जाते. उपकरणांद्वारे प्राप्त माहितीचे विश्लेषण केले जाते. शासनास जलसंसाधन प्रकल्पांसाठी लागणाऱ्या विविध आधुनिक शास्त्रीय आणि गणिती उपकरणांच्या खरेदीचे ' खरेदी सल्लागार समिती 'ब' चे कामही या विभागाकडे आहे. संस्थेच्या विद्युत देखभालीसाठी स्वतंत्र कक्ष या विभागांतर्गत कार्यरत आहे.

**(९) भूकंप आधार सामग्री पृथःकरण विभाग :** महाराष्ट्रातील भूकंपविषयक माहिती संकलित करण्याच्या दृष्टीने संस्था ' नोडल एजन्सी ' आहे. विविध पाटबंधारे प्रकल्पांवर बसविलेल्या भूकंपमापक उपकरणांद्वारे प्राप्त झालेल्या भूकंप माहितीचे विभागात विश्लेषण केले जाते. राज्यातील भूकंप विषयक माहितीची त्रैमासिक पत्रिकाही तयार केली जाते. कंपनांचा (Vibrations) चा बांधकामांवर होणाऱ्या परिणामांचाही या विभागात अभ्यास केला जातो. संस्थेच्या स्थापत्य देखभालीसाठी स्वतंत्र कक्ष या विभागांतर्गत कार्यरत आहे. तसेच संस्थेचे लेखाविषयक काम भूकंप विभागाद्वारे केले जाते.

## २.२ मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना :

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (मसंसं) जलसंपदा विभागाची एक महत्त्वाची संघटना आहे. या संघटनेंतर्गत माती धरण, दगडी धरण यांच्या विविध घटकांची संकल्पने तसेच कालव्यावरील मोठ्या बांधकामाची संकल्पने, उपसा सिंचन योजनाची संकल्पने केली जातात. या संकल्पनासाठी महाराष्ट्रातील स्थानिक परिस्थितीला अनुसरुन तसेच बांधकामांच्या गरजा लक्षात घेऊन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने स्वतंत्र संकल्पन पद्धती विकसित केल्या आहेत.

संघटनेत खालीलप्रमाणे एकूण चार मंडळ कार्यालये असुन त्यांचे अंतर्गत असलेल्या एकूण १६ संकल्पचित्र विभागांमार्फत संकल्पनांची कामे पूर्ण केली जातात. प्रत्येक संकल्पचित्र विभाग कार्यकारी अभियंता यांचे अखत्यारीत आहे.

अ) अधीक्षक अभियंता, माती धरण मंडळ, म.सं.सं, नाशिक
ब) अधीक्षक अभियंता, दगडी धरण मंडळ, म.सं.सं, नाशिक
क) अधीक्षक अभियंता, दरवाजे मंडळ, म.सं.सं, नाशिक
ड) अधीक्षक अभियंता, विद्युत गृहे मंडळ, म.सं.सं, नाशिक

## २.३ धरण सुरक्षितता संघटना

महाराष्ट्र राज्यातील जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व लहान मोठी धरणे, तसेच खाजगी मालकीची धरणे यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने देखभाल होणे आवश्यक असुन सदर देखभालीचे सनियंत्रण करण्यासाठी धरण सुरक्षितता संघटना, नाशिक मुख्यालयात कार्यरत आहे. अधीक्षक अभियंता यांचे अधिपत्याखाली धरण सुरक्षितता संघटना असुन त्यासाठी चार विभाग कार्यरत आहेत. या संघटनेमार्फत दरवर्षी सर्वसाधारणपणे १०% धरणांची मान्सुनपूर्व व मान्सुननंतर पाहणी केली जाते. धरण सुरक्षिततेची प्राथमिक जबाबदारी क्षेत्रिय कार्यालयांची असली तरी सदर देखभालीचे सनियंत्रण या संघटनेकडून केले जाते.

धरणांची तपासणी करतांना आढळलेले दोष, त्रुटी दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना क्षेत्रिय अधिका-यांना सुचविली जाते. क्षेत्रिय अधिका-यांकडून मान्सूनपूर्व आणि मान्सूनोत्तर तपासणी अहवाल प्राप्त झाल्यावर धरणस्थिती अहवाल धरण सुरक्षितता संघटनेकडून तयार करण्यात येतो व सर्व संबंधित क्षेत्रिय अधिका-यांना त्रुटी/दोष निवारणासाठी दरवर्षी पाठविण्यात येतो.

## २.४ महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी :

जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांचे तांत्रिक ज्ञानाचे अद्ययावतीकरण होण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनीची स्थापना करण्यात आली आहे.

महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग १ व वर्ग २ च्या सरळसेवा प्रविष्ट अभियंत्यांना हंगामी स्वरुपात प्रशिक्षण देण्यासाठी १९६४ मध्ये नाशिक येथे अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय स्थापन करण्यात आले व नंतर त्याचे महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी (मअप्रप्र) असे नामकरण करण्यात आले. महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी अंतर्गत खालील प्रमाणे कामे केली जातात.

**अ) प्रशिक्षण**

- महाराष्ट्र लोक सेवा आयोगामार्फत महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग १ व वर्ग २ मध्ये प्रवेश केलेल्या पदवीधर अभियंत्यांना त्यांच्या शिक्षणास पुरवणी म्हणून जलसंपदा आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या दोन अभियांत्रिकी विभागामधील शासकीय नियम, पद्धती इ. बाबत प्रशिक्षण देणे.
- राजपत्रित दर्जावर पदोन्नती मिळालेल्या अधिका-यांना प्रशिक्षण देणे.
- सेवारत अभियंत्यांचे ज्ञान पुनर्जागृत आणि अद्यावत करणे. स्थापत्य अभियांत्रिकी मधील क्षेत्रिय कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यासाठी औरंगाबाद आणि नागपूर येथे प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यात आली. तसेच यांत्रिकी आणि विद्युत क्षेत्रिय कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यासाठी पुणे येथे प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आले.

अनुभवी अभियंत्यांच्या सूचना लक्षात घेऊन, प्रशिक्षण कार्यक्रम आखला जातो.

**ब) परीक्षा**

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी तर्फे खालील जलसंपदा आणि सार्वजनिक बांधकाम विभागातील (१) स्थापत्य, यांत्रिकी, आणि विद्युत उप अभियंता, सहाय्यक कार्यकारी अभियंता आणि सहाय्यक अभियंता वर्ग १ यांचेसाठी व्यावसायिक परीक्षा, (२) स्थापत्य, यांत्रिकी आणि विद्युत कनिष्ठ अभियंत्यांसाठी व्यावसायिक परीक्षा (३) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांसाठी व्यावसायिक परीक्षा ४) सेवारत कर्मचा-यांसाठी कालवा निरीक्षक आणि मोजणीदार या पदांकरिता अर्हता परीक्षांचे आयोजन केले जाते.

## २.५ गुण नियंत्रण :

महाराष्ट्रातील जलसंपदा विभागांतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पाच्या विविध घटकांच्या बांधकामाचे गुण नियंत्रणासाठी मुख्य अभियंता (सं.प्र.सं.सु.) यांच्या अधिपत्याखाली तीन गुणनियंत्रण मंडळे नागपूर, पुणे, औरंगाबाद मुख्यालयात कार्यरत आहेत. या गुणनियंत्रण मंडळाच्या अखत्यारीत ११ विभागांमार्फत बांधकामाचा दर्जा राखण्यासाठी गुणनियंत्रण केले जाते.

## २.६ नियोजन व जलविज्ञान :

जागतिक बँकेच्या सहकार्याने हाती घेतलेल्या जलविज्ञान प्रकल्प अंतर्गत उपलब्ध भूपृष्ठावरील उपलब्ध जलसंपत्ती विषयक, तसेच जलगुणवत्ता व हवामान विषयक आधारसामग्रीचा सर्वांगिण विकास व उपयोग व्हावा हा मुळ उद्देश आहे. त्याकरिता सहभागी कार्यालयातील संस्थांचे संघटनात्मक मांडणीमध्ये सुधारणा घडवून आणणे, त्यायोगे जलसंपत्ती विषयक आधारसामग्रीचे मापन, दृढीकरण, तुलना, पृथ:करण, साठवण व वितरण करण्यासाठी तांत्रिक क्षमतेमध्ये व भौतिक सुविधांमध्ये सुधारणा घडवून आणणे या महत्वाच्या बाबींचा समावेश आहे. जलविज्ञान प्रकल्पाचे कार्यालय मेरी परिसरात मुख्य अभियंता यांचे अधिपत्याखाली कार्यरत आहे. मा. मुख्य अभियंता यांचे अधिपत्याखालील दोन मंडळ कार्यालये नाशिक मुख्यालयात कार्यरत आहेत.

आधार सामग्री संकलन मंडळांतर्गत ५ विभागांमार्फत जलसंपत्ती विषयी आधार सामग्री संकलीत केली जाते. या विभागाची कार्यालये पुणे, औरंगाबाद, ठाणे, नागपूर, अमरावती येथे आहेत.

आधार सामग्री पृथ:करण मंडळांतर्गत ३ विभाग कार्यरत आहेत. पैकी दोन विभाग नाशिक येथे व खोरे समरुपन विभाग पुणे येथे कार्यरत आहे.

मुख्य अभियंता (नियोजन व जलविज्ञान) यांचे अखत्यारित अधीक्षक अभियंता, माहिती संकलन व नियोजन या मंडळामार्फत राज्यातील जलसंपदा/जलसंधारण प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र देण्याचे काम तसेच राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती मार्फत रू. २५ कोटी पेक्षा जास्त रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकिय मान्यतांच्या प्रस्तावांचे छाननी व clearance चे काम करण्यात येते.

# ३.० *बांधिलकी-*

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना महासंचालक (संप्रजसंसु) यांचे अखत्यारितील सर्व कार्यालये -

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवतील.

ब) सौजन्यपूर्ण व मदतीची वृत्ती ठेऊन कामाच्या वेळेत निपटारा करतील.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवतील.

यासाठी वेळोवेळी विविध माहिती नागरिकांना उपलब्ध करण्यात येईल.

## ४.० नागरिकांची जबाबदारी-

* शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.
* नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
* नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
* विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.
* नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

## ५.० सनदेचा आढावा

अ) या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत संस्थांकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येईल.

ब) ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभिर्यपूर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वत:हून काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच संस्थेच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ६.० नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी-

महासंचालक (सं.प्र.ज.सं.सु.) यांचे अखत्यारितील सर्व कार्यालये या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी १/१/२०१२ पासून करण्यास कटीबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन आवश्यक बदल करण्यात येतील.

महासंचालक (सं.प्र.ज.सं.सु.) यांचे अखत्यारितील सर्व कार्यालये खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. संस्थांच्या कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील, सौजन्यपूर्ण मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल तसेच नागरिकांच्या गा-हाण्याचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.